‘हिंदु जनजागृती समिती’ पुरस्कृत ग्रंथ !

ग्रंथमालिका ‘धर्मरक्षण’ : धर्मांतर – खंड १

# धर्मांतराच्या डावपेचांपासून सावधान !

## (धर्मांतरितांच्या शुद्धीकरणाचे शास्त्र अंतर्भूत)

मराठी (Marathi)


**लेखक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सहलेखक**

**श्री. रमेश हनुमंत शिंदे**




## सनातन संस्था


**‘धर्मांतरा’च्या समस्येविषयी हिंदु समाजात जागृती करा !**

- हा ग्रंथ किमान १० आप्त, मित्र व कार्यालयीन सहकारी यांना भेट द्या !
- या ग्रंथाचे प्रायोजक बना व अन्यांना प्रायोजक बनण्यासाठी प्रवृत्त करा !
- हा ग्रंथ वाचनालये, रुग्णालये आदी ठिकाणी ठेवण्यास संबंधितांना सांगा !

# ग्रंथाच्या लेखकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २१.११.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## श्री. रमेश शिंदे (राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)



'सनातन धर्मभूषण', 'हिंदु कुलभूषण पुरस्कार', 'सांस्कृतिक योद्धा पुरस्कार' आदी पुरस्कारांनी सन्मानित असून धर्मप्रसारक म्हणून देशभर प्रवास करतात. 'बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार', धर्मांतर, 'हिंदु राष्ट्र', 'मनुस्मृति', 'लोकशाहीतील दुष्प्रवृत्ती', 'हलाल जिहाद' आदी विषयांवरील सनातनच्या ग्रंथांचे संकलक आहेत.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका


**प्रकरण १ : धर्मांतराची समस्या** ८

१. अर्थ आणि समानार्थी शब्द ८

२. धर्मांतराचे सर्वसाधारण प्रकार ८

३. हिंदुस्थानातील धर्मांतराचा इतिहास ८

४. हिंदूंचे धर्मांतर करण्यामागील अहिंदूंचा उद्देश ! १६

५. हिंदूंच्या धर्मांतराची व्याप्ती १७

६. धर्मांतर होण्यामागील हिंदूंचे दोष २५

७. धर्मांतर केल्यानंतर हिंदूंच्या होणाऱ्या परवडीची काही उदाहरणे २६

८. धर्मांतराचे दुष्परिणाम २७

९. आध्यात्मिकदृष्ट्या धर्मांतर करणे अयोग्य ! ३४

१०. संविधानातील २५ वा अनुच्छेद आणि धर्मांतर ३५

११. हिंदु समाजाला आवाहन ३७

१२. हिंदुत्ववादी संघटनांना आवाहन ४०

१३. धर्मांतराला आळा घालण्याचे उपाय ४१

१४. भावी हिंदु राष्ट्रात हिंदूंच्या धर्मांतरावर बंदी असेल ! ४६

**प्रकरण २ : धर्मांतराच्या डावपेचांपासून सावधान !** ४७
१. ख्रिस्ती आणि मुसलमान यांचे हिंदूंचे धर्मांतर करण्यामागील हेतू ४७
२. **हिंदूंच्या ख्रिस्तीकरणासाठी वापरले जाणारे डावपेच** ४९
३. **हिंदूंच्या इस्लामीकरणासाठी वापरले जाणारे डावपेच** ७९
४. **धर्मांतराच्या संकटाचा अभ्यासपूर्ण प्रतिकार करा !** ८६
५. हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या अहिंदूंना वैध मार्गाने रोखा ! ८८
**प्रकरण ३ : धर्मांतराविषयी अयोग्य विचार आणि खंडण** ८९
**प्रकरण ४ : धर्मांतरितांचे शुद्धीकरण** ९१
१. व्याख्या ९१
२. शुद्धीकरणाविषयी धर्मशास्त्र काय सांगते ? ९१
३. शुद्धीकरणाच्या विविध पद्धती आणि विधी ९३
४. धर्मांतर करून हिंदु झालेल्यांसाठी साधनामार्ग ९४
५. शुद्धीकरणाविषयी स्वामी विवेकानंदांनी केलेले शंकानिरसन ! ९४
६. हिंदु समाजाला आवाहन ९६

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## मनोगत

हिंदुस्थान आणि हिंदु धर्म यांवर काही शतकांपासून होत असलेले परधर्मियांचे धार्मिक आक्रमण म्हणजे धर्मांतराची समस्या ! इतिहासात अरबांपासून इंग्रजांपर्यंत अनेक परकियांनी हिंदुस्थानवर आक्रमणे केली. साम्राज्यविस्तारासह स्वधर्माचा प्रसार, हाच या सर्व आक्रमणांचा गाभा होता. अहिंदूंनी त्यांची लोकसंख्या वाढावी, या महत्त्वाकांक्षेतून हिंदूंच्या धर्मांतरासाठी छळ, बळ, कपट यांपासून प्रलोभने, फसवणूक यांपर्यंत वेगवेगळे घटनाविरोधी मार्ग अवलंबले. आजही या परकियांचे वारस तेच ध्येय ठेवून हिंदुस्थानात नियोजनबद्धरित्या कार्यरत आहेत आणि धर्मशिक्षण नसल्याने धर्माभिमानशून्य बनलेला हिंदु समाज त्याला मोठ्या संख्येने बळी पडत आहे. ‘स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।’, म्हणजे ‘स्वधर्म पाळतांना मृत्यू आला, तरी परधर्म स्वीकारण्यापेक्षा तो मृत्यू श्रेयस्कर आहे’, असे तत्त्व श्रीमद्भगवद्गीतेत सांगितले आहे. ‘पाण्यात रहाणारा मासा तथाकथित तुपात गेला, तरी त्याचे मरण निश्चित असते, तसेच स्वधर्म सोडून परधर्मांत जाणे, म्हणजे मरण ओढवून घेणे होय’, हे हिंदूंनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

हिंदु समाजाचे धर्मांतर करण्याचा अहिंदूंचा सुनियोजित कट, त्यासाठी त्यांना मिळणारे परकीय अर्थसाहाय्य, धर्मांतरामुळे होणारे सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिणाम इत्यादींविषयी या ग्रंथात सविस्तर विवेचन केले आहे. ‘धर्मांतर रोखायचे कसे, धर्मांतराच्या विरोधात हिंदूंनी वैधरित्या (सनदशीररित्या) कोणती भूमिका घ्यावी आणि काय कृती करावी’, यांचे विवेचनही या ग्रंथात केले आहे. धर्मांतरितांच्या ‘शुद्धीकरण’ प्रक्रियेविषयी स्वतंत्र प्रकरण या ग्रंथात अंतर्भूत केले आहे.

कुंभकर्ण वर्षातील सहा मासच झोपायचा; पण हिंदु समाजरूपी कुंभकर्ण धर्मांतराच्या समस्येविषयी शेकडो वर्षे झोपलेलाच आहे. हिंदूंची पुढील पिढी अहिंदु होऊ नये, यासाठी हा ग्रंथ वाचून हिंदूंवरील धर्मांतराचे आक्रमण हिंदूंनी परतवून लावावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! – **लेखक**